# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:15.05.2026** **वारः शुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सहा दिवसांच्या परदेश दौऱ्यावर रवाना होणार
2. महाराष्ट्रात साताऱ्यात आज प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतील पाच लाख घरांचं लोकार्पण
3. जागतिक इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांची वाढ
4. महाराष्ट्रासह, सोळा राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया 30 जूनपासून आणि
5. आशियाई मुष्टीयुद्ध पंधरा वर्षांखालील मुलांच्या अजिंक्यपद स्पर्धेत भारताची 9 सुवर्णपदकांसह 27 पदकांची लयलूट

**<u>पंतप्रधान संयुक्त अरब अमिराती</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून सहा दिवसांच्या परदेश दौऱ्यावर रवाना होत आहेत. या दौऱ्यादरम्यान ते संयुक्त अरब अमिराती, नेदरलँडस्, स्वीडन, नॉर्वे, आणि इटली या देशांना भेट देणार आहे. पहिल्या टप्प्यात ते आज युएईमध्ये राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेत अल नाहयान यांची भेट घेतील आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर विशेषतः ऊर्जा सहकार्य तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय विषयांवर चर्चा करतील. दौऱ्यासंदर्भात वार्ताहर परिषदेत माहिती देताना परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव असीम महाजन यांनी ऊर्जा हा द्विपक्षीय संबंधांचा प्रमुख आधारस्तंभ असल्याचं सांगितलं.

**<u>ब्रिक्स पंतप्रधान</u>**

बहुपक्षीय वादाला बळकटी देण्यासाठी, शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी तसंच आर्थिक लवचिकता वाढवून अधिक सर्वसमावेशक जागतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी, ब्रिक्स भारताच्या अध्यक्षतेखाली एकत्रितपणे काम करेल असा निर्वाळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्लीत दिला. दिल्लीत ब्रिक्स देशांचे परराष्ट्र मंत्र्यांसह भेटीला आलेल्या शिष्टमंडळाशी पंतप्रधानांनी काल संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील सहकार्याला चालना देण्यासाठी ब्रिक्स हे महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून उदयाला आले आहे. असही त्यांनी नमूद केलं. नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या द ब्रिक्स देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाली. तत्पूर्वी, ब्रिक्स देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत, परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी जागतिक व्यवस्थेत शांतता आणि सुरक्षितता हे घटक केंद्रस्थानी आहेत. लवचिकता, नावीन्य, सहकार्य आणि शाश्वतता याची उभारणी ही या बैठकीची मध्यवर्ती संकल्पना आहे. ब्रिक्स@20 संकल्पनेवर आधारित आयोजित सत्रामध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी बदलत्या वास्तव जागतिक परिस्थितीला प्रतिसाद म्हणून ब्रिक्सने आपल्या कार्यक्रम आणि सदस्यत्वाचा विस्तार केल्याचं अधोरेखित केले.

**<u>शिवराज सिंग चौहान</u>**

महाराष्ट्रातील साताऱ्यात आज होणाऱ्या, 'प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना' लाभार्थी परिषद आणि 'महा आवास अभियानाच्या' राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याला केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंग चौहान उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

'प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजने'अंतर्गत उभारण्यात आलेली पाच लाख घरं लाभार्थींना वितरित केली जाणार असून सहा लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या जातील. या योजनेअंतर्गत आतापर्यंत तीन कोटी घरं उभारण्यात आली आहेत.

**राजनाथ सिंग**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज आंध्र प्रदेशातील श्री सत्य साई जिल्ह्यातल्या पुट्टपर्थी इथं अनेक हवाई आणि संरक्षण दलांशी निगडीत विविध प्रकल्पांची पायाभरणी होणार आहे. त्याशिवाय सिंह यांच्या हस्ते भारत डायनामिक्स लिमिटेडच्या नव्या अत्याधुनिक नौदल प्रणाली उत्पादन सुविधेची पायाभरणी होणार आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यावेळी उपस्थित राहातील.

**इंधन दरवाढ**

जागतिक स्तरावर झालेल्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे देशातल्या विविध राज्यांमध्ये इंधनाच्या किंमतीमध्ये फरक पडणार आहे. मुंबईत साध्या पेट्रोलचा दर वाढून प्रती लीटर 106 रुपये 68 पैसे तर डिझेलचा दर प्रती लीटर 93 रुपये 14 पैसे होणार आहे.

**सोने-आयात मर्यादा**

परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने, सोने आयातीवर नवीन निर्बंध लागू केले आहेत. यानुसार, सोन्याच्या दागिन्यांच्या निर्यातदारांसाठी एका परवान्यावर आता कमाल शंभर किलो शुल्कमुक्त सोन्याचीच आयात करता येणार आहे. तसंच, नव्याने अर्ज करणाऱ्या कंपन्यांच्या उत्पादन प्रकल्पांची प्रत्यक्ष तपासणी बंधनकारक करण्यात आली आहे. या तपासणीत, उद्योगांची उत्पादन क्षमता आणि कार्यरत स्थितीची पडताळणी करण्यात येणार आहे.

**पुनरीक्षण ईसी**

भारतीय निवडणूक आयोगानं मतदार यांज्या विशेष सखोल पुनरीक्षण म्हणजेच एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा काल केली.  महाराष्ट्रासह, सोळा राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया 30 जूनपासून सुरू होणार आहे. या दरम्यान जवळपास साडेतीन लाखांहून अधिक 'बूथ स्तरावरील अधिकारी' 36 कोटींपेक्षा अधिक मतदारांच्या घरोघरी जाऊन भेटी देतील; या कामात त्यांना, गणना टप्प्यादरम्यान राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या साडेतीन लाख 'बूथ स्तरावरील प्रतिनिधी' सहकार्य करतील.

**नीट बैठक**

वैद्यकीय प्रवेशासाठीच्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट या परीक्षेच्या पुनर्आयोजनाचा आढावा घेण्यासाठी काल संध्याकाळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या दिल्लीतल्या निवासस्थानी एका बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. आगामी नीट परीक्षा सुरळीत आणि कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठीच्या विविध पैलूंवर सविस्तर चर्चा बैठकीत झाली. बैठकीला उच्च शिक्षण सचिव, शालेय शिक्षण सचिव, राष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालकांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**ट्रम्प-चीन**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यादरम्यान काल चीनची राजधानी बीजिंगमध्ये चर्चा झाली. व्यापार, तंत्रज्ञान आणि प्रादेशिक सुरक्षा यांबाबत तणावाची स्थिती असूनही दोन्ही नेत्यांनी संघर्षाऐवजी सहकार्यावर भर दिला. व्हाईट हाऊसने दिलेल्या माहितीनुसार, ऊर्जेचा प्रवाह मुक्त, सुरळीत राखण्यासाठी हॉर्मुझची सामुद्रधुनी खुली राहिली पाहिजे, यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली.

**हिजबुल्ला-इस्रायल**

इस्रायल आणि लेबनान दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांदरम्यान काल अमेरिकेत शांतता चर्चेची तिसरी फेरी पार पडली. हिजबुल्लाहचे निशस्त्रीकरण आणि उभय देशांतील संबंध सुधारण्याबाबत या फेरीत चर्चा झाली. चर्चा आजही सुरू राहाणार आहे. माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, अंतिम करार होईपर्यंत हिजबुल्लाहविरुद्ध लष्करी कारवाया करण्याचे स्वातंत्र्य

आपल्याकडे कायम राहावे, अशी इस्रायलची इच्छा आहे. दुसरीकडे, इस्रायलने लेबनॉनच्या भूभागातून माघार घ्यावी, हवाई हल्ले थांबवावेत आणि सीमावर्ती गावांमधील विध्वंस थांबवावा, अशी लेबनानची मागणी आहे.

**वूशू-सुवर्ण पदक**

मकाऊमध्ये झालेल्या, अकराव्या सांदा विश्वचषक वूशू स्पर्धेत काल झालेल्या अंतिम सामन्यात भारताच्या अपर्णा दहियाने विद्यमान विश्वविजेत्या, व्हिएतनामच्या थी फुओंग एनगा एनगो वर विजय मिळवत सुवर्णपदक पटकावलं. या स्पर्धेतील भारताचं ही पहिलं सुवर्णपदक आहे.

**आशियाई मुष्टीयुद्ध**

उझबेकिस्तानमध्ये ताश्कंद इथं पार पडलेल्या आशियाई मुष्टीयुद्ध पंधरा वर्षांखालील मुलांच्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं 9 सुवर्ण, 6 रौप्य आणि 12 कास्य अशी 27 पदकांची लयलूट करत उल्लेखनीय कामगिरी केली. मुलींच्या गटात 7 सुवर्ण, 5 कास्य पदकांसह भारतानं अव्वल स्थान पटकावलं आहे. उर्वरीत 2 सुवर्ण, 4 रौप्य आणि 7 कास्य पदक मुलांच्या गटाने मिळवली.

**निधन-डॉ.आनंद नाडकर्णी**

ज्येष्ठ मानसोपचार तज्ञ डॉक्टर आनंद नाडकर्णी यांचं आज पहाटे ठाण्यात निधन झालं. ते 68 वर्षांचे होते. डॉक्टर नाडकर्णी हे विचारवंत, नाटककार, संगीतकार, कवि, चित्रकार देखील होते. 'मुक्तांगण' या व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून, व्यसनांच्या आहारी गेलेल्या अनेक तरुणांना त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणलं. औद्योगिक क्षेत्रातील तीसहून अधिक संस्थांसाठी आणि अनेक स्वयंसेवी संस्थांसाठी, त्यांनी मानसिक आरोग्य आणि आनुषंगिक विषयांचे सल्लागार आणि प्रशिक्षक म्हणून कार्य केलं आहे.

**उत्तर प्रदेश मृत्यू**

उत्तर प्रदेशमध्ये गेल्या 36 तासांत झालेल्या पाऊस, वादळ आणि वीज पडण्याच्या घटनांमध्ये 111 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 200 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन तातडीनं पाहाणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत. वेगाने वाहाणाऱ्या वाऱ्यांमुळे रेल्वे रुळांवर झाडं पडल्यानं त्याचा फटका पाटणा राजधानी एक्स्प्रेससह अनेक गाड्यांना बसला.

**केरळ पिवळा बावटा**

केरळसाठी हवामान विभागानं पावसासाठीचा पिवळा बावटा जारी केला आहे. त्यानुसार राज्यात सहा जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. केरळ आणि लक्षद्वीप किनारपट्टीवर मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.